# निशाणी क्र. १७ वरील आदेश

( सरकार वि. विशाल पांडूरंग तुळवे व इतर —७)

आरोपी नं. ८ विकास पांडूरंग तुळवे याने महाळूंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हा रजिस्टर नं. ४१९/२०२४ जो भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), १०९, २३८, २४९, ६१ (२) सह ३(५) व भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४(२५) व महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७(१)(३) व १३५ आणि भारतीय क्रिमिनल ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ प्रमाणे दाखल आहे, त्यामध्ये भारतीय नागरीक संरक्षण अधिनियम कलम ४८३ प्रमाणे तात्पुरता जामीन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. आरोपीचे कथन आहे की, त्याने सदरचा अर्ज तात्पुरता जामीन मिळणेसाठी वडीलांचे वैद्यकीय उपचार चालू आहेत या कारणावरुन दाखल केला आहे. त्याच्या वडीलांचे वय ७५ वर्षे आहे व त्यांना पोटाचा व किडनीचा आजार आहे. त्याच्या वडीलांना ता. ०५/१२/२०२४ रोजी सुदर्शन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल याठिकाणी दाखल केले आहे. वडील यकृताच्या आजारापासून १५ वर्षे आजारी आहेत. वडीलांची देखभाल करण्यासाठी कुटूंबात इतर सदस्य नाहीत. त्यामुळे त्याला दोन आठवडयांसाठी तात्पुरत्या स्वरुपाचा जामीन मंजूर करण्यात यावा.

३. फिर्यादी पक्षाने खुलासा सादर करून सदर आरोपीचा भाउ विकास पांडूरंग तुळवे हा गुन्हयातील मुख्य आरोपी आहे, आरोपीचे एकत्र कुटूंब आहे. त्याच्या कुटूंबात पत्नी, मुलगा व मुलगी आहे. तसेच त्याच्या घराशेजारी त्याच्या चुलत्यांची घरे आहेत. गुन्हा घडण्यापूर्वी मुख्य आरोपीने सदर आरोपी व इतर आरोपींबरोबर एका खोलीत चर्चा केली. मयताचे नातेवाईक व आरोपी एकाच गावचे रहिवासी आहेत.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. दोषारोपपत्रातील कागदपत्र पाहिले.

५. दोषारोपपत्राप्रमाणे मयत हा मोटारसायकलवरुन जात असतांना आरोपी नं. १ व २ यांनी त्याच्यावर कोयत्याने वार केले व त्यानंतर आरोपी नं. ३ ते ५ हे रिक्षामधून आले व त्यांनी पुन्हा मयतावर कोयत्याने वार केले. यावरुन मयताचा खुन हा निर्घुणपणे करण्यात आला असे सकृतदर्शनी दिसून येते.

६. आरोपीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन त्याचे वडील सुदर्शन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल ता. ०५/१२/२०२४ पासून उपचार घेत आहेत असे दिसते.

७. आरोपीतर्फे मा. राजस्थान उच्च न्यायालय यांच्या पुढील **प्रकरण राजाराम वि. राजस्थान राज्य (एआयआर ऑनलाईन २०२४ आरएजे १४६)** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. या प्रकरणात आरोपीचे वडील ६० वर्षे वयाचे होते व त्यांची तब्येत गंभीर होती व आरोपीविरुध्द एनडीपीएस ॲक्ट प्रमाणेचे अपराध होते व त्याचे लहान भाउ दुस—या राज्यात शिक्षणासाठी गेले होते व वडीलांचे ऑपरेशन करणे गरजेचे होते. आरोपीतर्फे मा. सर्वोच्च न्यायालय यांच्यापुढील प्रकरण **प्रदीप वि. एनआयए (आयए नं. ११२६९०/२०२३)** मधील आदेशाचा आधार घेतला आहे. या प्रकरणात आरोपीची पत्नी आजारी होती व तिला बायपास सर्जरीची गरज होती. तसेच आरोपीतर्फे मा. मध्यप्रदेश उच्च न्यायालयापुढील प्रकरण रविश वि. मध्यप्रदेश राज्य **(एमसीआरसी नं. १७९८८/२०२२ नि. ता . १८/०४/२०२२)** मधील आदेशाचा आधार घेतला आहे. या प्रकरणात आरोपीची पत्नी गरोदर होती व तिची डिलीव्हरी पुढील आठवडयात होणार होती व तिच्याकडे लक्ष देण्यासाठी कोणी नव्हते.

८. सदर प्रकरणातील घटनेचे गांभीर्य व घटना ता. ०१/०७/२०२४ म्हणजेच नजिकच्या काळातील आहे व आरोपी व साक्षीदार एकाच भागात राहणारे आहेत. त्यामुळे साक्षीदारांवर दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत आरोपीला तात्पुरत्या स्वरुपाचा जामीन मंजूर करणे योग्य ठरणार नाही. ज्याप्रमाणे साक्षीदारांवर दबाव येण्याची शक्यता आहे त्याचप्रमाणे आरोपीच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वाटते. याचा विचार करता व आरोपीचे वडील गंभीर स्वरुपाच्या आजारावर उपचार घेत आहेत व आरोपीचा भाउ सदरचा गुन्हयात आरोपी आहे त्यामुळे आरोपीला त्याच्या वडीलांना संबंधित हॉस्पीटलमध्ये जावून भेटण्याची परवानगी देणे उचित ठरेल जेणेकरुन आरोपीला वडीलांच्या उपचारांची माहिती मिळेल व त्यासाठी उपाययोजना करणे सोयीचे होईल. यावरुन पुढील आदेश पारीत करीत आहे:—

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी विकास पांडूरंग तुळवे यास तात्पुरता जामीन मंजूर न करता त्याला त्याचे वडील ज्या हॉस्पीटलमध्ये म्हणजे सुदर्शन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रायव्हेट लिमिटेड, खालुंबरे, तळेगाव चाकणरोड, ता. खेड याठिकाणी ता. १६/१२/२०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या दरम्यान हजर ठेवण्यात यावे.

२. आरोपीच्या सुरक्षेसाठी महाळूंगे एमआयडीसी पोलिस स्टेशन यांनी योग्य तो पोलिस बंदोबस्त पुरवावा.

३. आदेशाची प्रत संबंधित पोलिस स्टेशनला योग्य ती उपाययोजना करण्यासाठी पाठविण्यात यावी.

POL SURESH PRABHAKAR
Digitally signed by POL SURESH PRABHAKAR
Date: 2024.12.13 16:44:28 +0530

दिनांक: १३/१२/२०२४

(एस. पी. पोळ)
अतिरीक्त सत्र न्यायाधीश,
खेड — राजगुरुनगर, पुणे.

**CERTIFICATE**

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per the original order.”

| | |
|---|---|
| Name of the Steno | : Smt.P.P. Deo (Stenographer Grade-I) |
| Name of the Court | : Shri. S.P. Pol, Additional Sessions Judge, Khed-Rajgurunagar, Pune |
| Date of Order | : 13/12/2024. |
| Order signed by PO on | : 13/12/2024. |
| Order uploaded on | : 13/12/2024. |